


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १७९ वा शुक्रवार दि २९ ऑगस्ट २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांवर कारवाईबाबत राज्यभरात बोंब?

## अकोला असो की बुलढाणा कुठेही कारवाई नाहीच

### जिल्हा सामान्य रुग्णालयातून दिलेले बोगस दिव्यांग/ अस्तिव्यंग प्रमाणपत्र संबंधित विभाग कर्मचाऱ्यांची पूर्व परिस्थिती व आजची परिस्थितीची उच्चस्तरीय चौकशी करून त्या दोषींवर फोजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी होत आहे

### जिल्हा सामान्य रुग्णालयात वर्षोनुवर्षे व पात्रता नसतांनाही काही कर्मचारी व अधिकारी एकाच ठिकाणी... सविस्तर बातमी पुढील भागात

**बुलढाणा** - दिव्यांगत्वाचे बोगस प्रमाणपत्र प्राप्त करून नोकरीतील लाभ उपटण्याचे प्रकार सध्या राज्यभरात सुरू आहेत. राज्य शासनानेही बोगस दिव्यांगांवर कठोर फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहेत, परंतु शासनाच्या आदेशाला हरताळ फासल्या जात असल्याचे दिसून येत आहे. बुलढाण्याप्रमाणे अकोल्यातही अनेक बोगस दिव्यांग कर्मचारी शासकीय सेवेचे लाभ उपटत असल्याचा प्रकार समोर आला. मात्र, कारवाईबाबत सगळीकडेच बोंब असल्याचे दिसून येत आहे. बुलढाण्यात बोगस दिव्यांग शिक्षक व कर्मचाऱ्यांचा आकडा हा ५०० हून अधिक असण्याची खात्रिलायक माहिती दैनिक जनसंचलनलाव सिटी न्यूजला प्राप्त झालेली आहे.




दिव्यांग नागरिकांचे कल्याण व्हावे व त्यांच्या उत्थानासाठी शासनाच्या वतीने विविध प्रकारचे लाभ हे दिव्यांग लोकांना दिले जातात. परंतु काही समाजकंटक याचा लाभ घेण्यासाठी जिल्हा रुग्णालयात असलेल्या दिव्यांग बोर्डाच्या अधिकाऱ्यांना चिरीमिरी देऊन धडधाकट लोकं दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त करीत आहेत. या प्रमाणपत्राच्या भरोश्यावर पदोन्नती, बदली यांचे लाभ हे कर्मचारी घेत आहेत. यासंदर्भात काही सामाजिक कार्यकर्ते व दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने आवाज बुलंद केल्यानंतर काही महिन्यांपूर्वी जिल्हा परिषदेचे तत्कालीन शिक्षणाधिकारी खरात यांनी आदेश दिले होते. दिव्यांग प्रमाणपत्र असलेल्यानी जेजे हॉस्पिटल मुंबई येथे जाऊन तपासणी करण्याचे निर्देशही देण्यात आले होते. परंतु या आदेशामुळे बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली. कारण अशा बोगस कर्मचाऱ्यांची संख्या प्रचंड असल्यामुळे त्यासाठी पद्धतशीरपणे लॉबिंग करण्यात आले आणि शिक्षणाधिकाऱ्यांच्या या आदेशावर आजवर अंमलबजावणी झालीच नाही.मुंबईत काही दिवसांपूर्वी बोगस दिव्यांग प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या दोन कर्मचाऱ्यांना नुकतेच बडतर्फ करण्यात आले होते, त्यामुळे बुलढाण्यात अशीच कारवाई होण्याची अपेक्षा होती.

बुलढाण्यासारखीच स्थिती अकोल्यातही दिसून येत आहे. कारण अकोल्यातही बऱ्याच शिक्षक व कर्मचाऱ्यांनी बोगस दिव्यांग प्रमाणपत्र प्राप्त करून दिव्यांगत्वाचे लाभ उपटत आहेत. तेथेही कारवाईच्या नावाने अजूनही बोंब आहे. बुलढाण्यात तर या बोगस दिव्यांगांवर कारवाई होईल की नाही, अशी भलीमोठी शंका उपस्थित केली जात आहे.सध्याच्या घडीला राज्यातील नोकरशाही एव्हढी मुजोर आणि गेंड्याच्या कातडीची झाली आहे की, राज्य शासनाने दिलेल्या आदेशांचेही ती पालन करीत नसल्याचे दिसून येत आहे. कारण शासनाने आदेश दिल्यानंतरही आजपर्यंत बुलढाणा जिल्ह्यात एकाही बोगस दिव्यांगावर कारवाई झालेली नाही.

या नालायक बोगस दिव्यांग शिक्षक व कर्मचाऱ्यांमुळे जे खरे दिव्यांग आहेत, त्यांच्यावर मोठा अन्याय होत आहे. परंतु ही सर्व प्रक्रिया होताना मोठी आर्थिक उलाढाल झालेली असण्याची आणि यात अधिकाऱ्यांचेही खिसे गरम झालेले असण्याची शक्यता असल्याने कोणावरही कारवाई होताना सध्यातरी दिसून येत नाही. आता या प्रकरणी खुद्द राज्य शासनालाच पुढाकार घेऊन कारवाई करावी लागणार आहे. अशी कारवाई शासनाने केली तर ठीक अन्यथा शासनाचे आदेश देखील किती पोकळ आहेत हे सिद्ध होते

अजून बरेच काही पुढील भागात

# मेरा खुर्दमध्ये जुन्या वादातून तरुणावर हल्ला; एकास अटक



**अंढेरा** : पोलिस स्टेशन हद्दीतील मेरा खुर्द येथे २७ ऑगस्ट रोजी जुन्या वादातून दोन गटांत झालेल्या भांडणात एका तरुणाला दगड डोक्यात मारून गंभीर जखमी करण्यात आले. या प्रकरणात पोलिसांनी तत्काळ धाव घेऊन एका आरोपीस रात्रीच अटक केली असून, उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे.

दीपक ज्ञानेश्वर वाघमारे (रा. मेरा खुर्द) हे शेतीचा व्यवसाय करतात. त्यांचा भाऊ विलास वाघमारे ट्रॅक्टर चालकाचे काम करतो. घटनेच्या दिवशी दुपारी दोनच्या सुमारास सरपंच रमेश अवचार यांच्या शेतात ट्रॅक्टर घेऊन जात असताना आरोपींनी जुन्या वादाच्या रागातून त्यांना अडवले. आरोपी अविनाश बाबू भुसारी, पुरुषोत्तम संतोष काळे व योगेश सुरेश काळे (तिघे रा. मेरा खुर्द) यांनी विलास वाघमारे यांना मारहाण केली. यावेळी दगड डोक्यात मारल्याने ते गंभीर जखमी झाले.

घटनेची माहिती मिळताच ठाणेदार रुपेश शक्करगे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन जखमीला उपचारासाठी चिखली येथील रुग्णालयात दाखल केले. दरम्यान, आरोपी संतोष पुरुषोत्तम काळे याला पोलिसांनी मध्यरात्री अटक केली. ही कारवाई ठाणेदार शक्करगे, सुरेश जारवाल, बिट जमादार भरत पोफळे आणि सिद्धार्थ सोनकांबळे यांनी संयुक्तपणे केली.

२८ ऑगस्ट रोजी आरोपीला चिखली न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने आरोपीस ३० ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

# ...गिरण्यांच्या जमिनींना ग्रहण...

## संपादकीय लेख

मुंबईतील ङ्कमलाफ्सह सहा गिरण्यांच्या जमिनीवरील पुनर्विकासाच्या कामात नियमांचे मोठ्या प्रमाणावर उल्लंघन झाले असल्याचा ठपका विधिमंडळाच्या आश्वासन समितीने ठेवला आहे. विधिमंडळाच्या अधिवेशनात एखाद्या प्रश्नाच्या उत्तरात सरकारकडून जी आश्वासने दिली जातात, त्यांची पूर्तता योग्य रीतीने होते किंवा कसे हे पाहण्यासाठी विधिमंडळाच्या सदस्यांची ही समिती आहे. या समितीने ३० व ३१ जुलै रोजी मिठी नदी व मुंबईतील १२ गिरण्यांना विधिमंडळातील सरकारने दिलेल्या आश्वासनाबाबत भेटी दिल्या व त्यातून वरील बाबी समोर आल्या. मुळात बंद पडलेल्या गिरण्या पुन्हा सुरू करण्यासाठी भांडवलाची उभारणी करणे गिरणी मालकांना शक्य व्हावे म्हणून गिरण्यांच्या अतिरिक्त जमिनी विकण्याची उपाययोजना सुरू केली गेली होती. खरं सांगायचे तर संपामुळे गिरण्या बंद पडल्या, असा गैरसमज राज्यातील सामान्य जनतेच्या मनात सरकार व मालकधार्जिण्या विचारवंतांनी इतका रुजवला की आज तेच सत्य असल्याचे असंख्यांना वाटते. मात्र, डॉ. दत्ता सामंत यांनी पुकारलेला संप तांत्रिकदृष्ट्या कधीच मागे घेतला नाही. दीड वर्ष मुंबईतील जवळपास दीड ते दोन लाख कामगारांनी अत्यंत नेटाने हा संप चालवला होता. पुढे मात्र कामगारांचा धीर सुटत चालला व त्यांनी माना खाली घालून हरलेल्या सैन्याप्रमाणे पुन्हा कामावर जायला सुरुवात केली होती. त्यामुळे मुंबईतील सगळ्या गिरण्या व्यवस्थित सुरू झाल्या होत्या. इतकेच नव्हे तर ऐंशीच्या दशकाच्या मध्यावर मुंबईतील एका गिरणीने १०० कोटींचा नफा कमावल्याची बातमी अर्थ वृत्तांकन करणाऱ्या एका अग्रणी दैनिकाने पहिल्या पानावर मुख्य बातमी म्हणून प्रसिद्ध केली होती. १९९१ साली शरद पवार यांनी मुंबईतील विकास नियमावलीत बदल केला व गिरण्यांच्या आधुनिकीकरणासाठी भांडवलाची गरज असून, गिरण्यांच्या जमिनीच्या विक्रीस परवानगी दिली. त्यात ही विक्री करताना जमिनीचे तीन समान हिस्से करून त्यातील एक मालकास, दुसरा मुंबई महानगरपालिकेस व तिसरा सर्वसामान्यांसाठी घरे व्हावीत म्हणून ङ्कम्हाडाफ्ला देण्याचे ठरले होते. गिरण्या बंद होण्याची सुरुवात ही विकास नियमावलीतील या बदलानंतर झाली. गिरणी मालकांची दोन तृतियांश जमीन यात जाणार असल्यामुळे चारचा एफएसआय देऊन त्यांचा तोटा भरून काढण्याची सूटही सरकारने दिली होती. तरीही मालकांचे रडगाणे सुरू झाल्याने पुढे दहा वर्षांनी विलासराव देशमुख व त्यानंतर सुशीलकुमार शिंदे या दोघांच्याही मुख्यमंत्री कालावधीत वरील नियमावलीत आणखी बदल झाले. जमिनीच्या वाटपात गिरणीचे बांधकाम असलेली जागा वगळून केवळ मोकळ्या जागेचेच वाटप करण्याचा निर्णय झाला व गिरणी मालकांच्या वाट्याला गिरण्यांची ८० टक्के जमीन आली. इतके असूनही ज्या जमिनी कोणे एके काळी सरकारने अत्यंत फुटकळ किमतीत उद्योग उभा राहावा म्हणून मालकांना दिल्या होत्या, त्यावर नियमानुसार काम करावे तर तेही झालेले दिसत नाही. मुंबईसारख्या शहरात आयटीसारखा उद्योग उभा राहावा म्हणून संबंधित जमिनीवर ८० टक्के आयटी पार्क व्हावे व उर्वरित जमिनीवर इतर व्यावसायिक कामे करावीत, या नियमाला धाब्यावर बसवून बाकी सगळे धंदे राजरोसपणे गेले तीन दशके अव्याहत सुरू आहेत. हे सर्वसामान्यांच्या नजरेत दररोज येतच होते, मात्र चार वर्षांपूर्वी कुठल्या चर्चेत सरकारने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता झाली किंवा कसे, हे शोधण्यासाठी समिती गेल्यावर आता पुन्हा जुने सत्य नव्याने समोर आले आहे. मुंबईत गाड्या उभ्या करणे ही मोठी समस्या असताना या गिरण्यांमधील पार्किंगसाठी महापालिकेच्या पार्किंगच्या दुप्पट तिप्पट भाडे आकारले जात असल्याचेही समोर आले आहे. इतकी मोठी जागा व इतका मोठा एफएसआय मिळूनही नियमांना पायदळी तुडवण्यामागील



ही मानसिकता समोर दिसेल ते नियम धाब्यावर बसवून ओरबाडून खाण्याच्याच प्रवृत्तीचे निदर्शक आहे. अनेक ठिकाणी इमारतींच्या गच्चीत पावसाळ्याकरिता टाकलेले तात्पुरते छप्पर कायमस्वरूपी करून त्याचा व्यावसायिक वापर सुरू आहे. त्यामुळेच या गिरण्यांमधील इमारतींना अनेकदा आगी लागून त्यात मोठ्या प्रमाणावर जीवितहानी घडल्याचा इतिहास ताजा आहे. आता विधिमंडळाच्या आश्वासन समितीला जे वास्तव दिसले त्याचा अहवाल ही समिती विधिमंडळात ठेवेलच. मात्र या अहवालावर राणा भीमदेवी थाटात अनेक जण केवळ ङ्कसाधक बाधकफ्चर्चा करतील व पुढे सगळे थंड बस्त्यात बांधून आपल्या देशातील राजकीय उच्च परंपरांचे पालन करतील की सर्वसामान्यांच्या घामातून उभ्या राहिलेल्या या शहराचा कारभार कायदे व नियमांनुसारच चालणार हे कठोरपणे दाखवून देतील, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## भरधाव एसटीच्या धडकेत अकरा मेंढ्या ठार

जनसंचलन/मोताळा

भरधाव एसटी बसच्या धडकेत अकरा मेंढ्या ठार तर सहा मेंढ्या जखमी झाल्याची घटना बुधवारी (दि. २७) ऑगस्ट रोजी सकाळी अकरा वाजेच्या सुमारास खडकी फाट्यानजीक वळणावर घडली. या अपघातात संबंधित मेंढपाळाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, याबाबत बोराखेडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील वारुळी येथील शांताराम संजु बिचकुले यांनी तक्रार दिली. त्यांच्याकडे सुमारे शंभर मेंढ्या आहेत. ते कुटुंबासह मागील दोन महिन्यांपासून खडकी फाट्याजवळ पाल ठोकून वास्तव्यास असून परिसरातील शेतशिवारात मेंढ्या चारत होते. २७ ऑगस्ट रोजी सकाळी ते व त्यांचा लहान भाऊ मेंढ्या चारत खडकी फाट्यानजीकच्या वळणावरून जात असताना बुलढाण्याकडून मोताळा मार्गे मलकापूरकडे जाणारी छत्रपती संभाजीनगर ते मलकापूर ही एमएच-२०-बीएन-४०३६ क्रमांकाची एसटी बस भरधाव वेगात आली. या बसची मेंढ्यांना धडक बसली. त्यात अकरा मेंढ्या ठार तर सहा जखमी झाल्या. या अपघातात सुमारे १ लाख ५८ हजार रुपयांचे नुकसान त्यांनी तक्रारीत नमूद केल आहे. दरम्यान, अपघातानंतर बसचालकाने वाहन न थांबवता घटनास्थळावरून बस घेऊन पलायन केले. प्रकरणी पोलिसांनी एसटी बस जप्त करून चालक सुभाष धुमा राठोड यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस हवालदार बळीराम खंडागळे आणि पोलिस कॉन्स्टेबल शेख इसाक करीत आहेत.







The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मनोज जरांगे मुंबईत दाखल होण्यापूर्वी दुर्घटना, मराठा आंदोलकांच्या गाडीचा चेंबूर येथे अपघात...



**मुंबई :** मराठ्यांचं भगवं वादळ मुंबईच्या दिशेला निघालं आहे. मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांचा मोर्चा आझाद मैदानाच्या दिशेला निघाला आहे. मनोज जरांगे यांनी २९ मार्चपासून आझाद मैदानात उपोषणाला बसण्याची घोषणा केली आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील आग्रही आहेत. मनोज जरांगे यांनी राज्यातील लाखो मराठ्यांना मुंबईत आंदोलनासाठी येण्याचं आवाहन केलं आहे. त्यांच्या मोर्चात ठिकठिकाणाहून लाखो मराठे सहभागी होत आहेत. असं असताना त्यांच्या आंदोलनात एक दुखद घटना घडली आहे. चेंबूरमध्ये मराठा कार्यकर्त्यांच्या गाडीचा अपघात झाला आहे.मुंबईत चेंबूर ब्रिजवर मराठा कार्यकर्त्यांच्या गाडीचा अपघात झाला आहे. या अपघातात तीन मराठा कार्यकर्ते जखमी झाले आहेत. अपघातानंतर तातडीने बचाव कार्य करण्यात आलं. जखमी आंदोलकांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. जखमी आंदोलक लवकरात लवकर बरे व्हावे, अशी प्रार्थना केली जात आहे.

दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनात सहभागी झालेल्या एका मराठा आंदोलकाचा सकाळी मृत्यू झाला होता. मनोज जरांगे पाटील यांनीदेखील या घटनेवर दु:ख व्यक्त केलं होतं.

सतीश देशमुख असं या मराठा आंदोलकाचं नाव आहे. सतीश देशमुख हे बीडच्या केज तालुक्यातील वरपगावचे रहिवासी होते. ते आपल्या मित्रासह मनोज जरांगे यांच्या मोर्चात सहभागी झाले होते. पण जुन्नरच्या नारायणगाव येथे आल्यावर त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागलं. त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आलं. पण तोपर्यंत उशिर झाला होता. रुग्णालयात नेल्यावर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं.सतीश देशमुख यांच्या मृत्यूनंतर मराठा आंदोलकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. मनोज जरांगे पाटील यांनीदेखील या घटनेनंतर दु:ख व्यक्त केलं होतं. तसेच या घटनेला सरकार जबाबदार असल्याचं ते म्हणाले होते. सतीश देशमुख यांच्या मृत्यूच्या घटनेवर खासदार बजरंग सोनवणे यांनीदेखील दु:ख व्यक्त केलं होतं. सतीश देशमुख यांचं निधन झाल्याच्या बातमीनंतर चेंबूरमध्ये मराठा आंदोलकांच्या गाडीचा अपघात झाल्याची घटना घडली.

# पप्पाने मम्मीचे हात-पाय बांधले, रॉकेल ओतलं अन् लायटरने

## ७ वर्षांच्या चिमुकलीने सारं सांगितलं, नवी मुंबईत खळबळ




**नवी मुंबई:** एका व्यक्तीने विवाहबाह्य संबंधाच्या संशयावरून आपल्या ३२ वर्षीय पत्नीला जाळून मारल्याचा आरोप आहे. त्यानंतर त्याने या प्रकाराला पत्नीने स्वत:चा जीव घेतला असं दाखवण्याचा प्रयत्नही केला. मात्र, त्याच्या सात वर्षांच्या मुलीने पोलिसांना सारं स्पष्टपणे सांगितले. तिच्या वडिलांनी तिच्या आईला जाळलं, असं या चिमुकलीने सांगितलं. तेव्हा त्याचा खोटारडेपणा उघड झाला. २५ ऑगस्ट रोजी पहाटे उरण परिसरातील पागोटेगाव येथे ही घटना घडल्याची माहिती आहे. याप्रकरणी ३५ वर्षीय आरोपीला दुसऱ्याच दिवशी अटक करण्यात आली आहे. उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक हनीफ मुलानी यांनी पीटीआयला सांगितले की, आरोपी राजकुमार रामशिरोमणी साहू याला त्याची पत्नी जगराणी राजकुमार साहू यांचे विवाहबाह्य संबंध असल्याचा संशय होता. त्याने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, त्याने पीडितेचे हातपाय बांधले, तिच्यावर रॉकेल ओतले आणि लाइटरने तिला जाळून टाकले.महिलेला जखमी अवस्थेत रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

आरोपीने दावा केला होता की त्याच्या पत्नीने स्वत:ला घराच्या एका खोलीत कोंडून घेतले आणि आपल्या आयुष्याची अखेर केली, त्यानंतर सुरुवातीला अपघाती मृत्यूचा गुन्हा दाखल करण्यात आला. पण तपासात त्याच्या जबाबात तफावत आढळून आल्याचं पोलिसांनी सांगितलं.पोस्टमार्टम रिपोर्ट आणि जोडप्याच्या सात वर्षांच्या मुलीच्या महत्त्वपूर्ण जबाबानंतर या प्रकरणाचं संपूर्ण सत्य समोर आलं. आरोपीने दावा केला होता की त्याच्या पत्नीने स्वत:ला खोलीत कोंडून घेतले आणि जीव दिला. परंतु मुलाचे जबाब पतीच्या जबाबाशी जुळत नव्हते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज देखील तपासले आणि त्यात घटनेनंतर काही तासांत आरोपी घराबाहेर पडताना दिसून आला. हा एक महत्त्वाचा पुरावा होता जो घटनेवेळी घरी उपस्थित नव्हता या पुरूषाच्या दाव्याच्या विरोधात जात होता, असंही अधिकाऱ्यांनी सांगितले. पतीला अटक करण्यात आली असून हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तीन वर्षांपूर्वी मुलाचा अपघाती मृत्यू, आता बापाने मराठा आंदोलनात सोडला जीव; सतीश देशमुख कोण आहेत?



**बीड :** बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील वरपगाव येथील रहिवासी सतिश ज्ञानोबा देशमुख (वय ४५), असं नाव असून यांचं जुन्नर येथे अचानक हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाल्याचं समोर आलं आहे. त्यांचं पार्थिव स्वगृही आणलं जात असून त्यांच्या अकाली निधनानं कुटुंबीय, मित्रपरिवार आणि गावामध्ये हळहळ व्यक्त होत आहे.मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनात ते सक्रिय होते. चलो मुंबई आंदोलनात सहभागी झालेल्या बांधवांनी स्वतः च्या आरोग्याची व सहकाऱ्यांच्या सुरक्षिततेची विशेष काळजी घ्यावी, असं आव्हान पाटलांनी केलं आहे. सतिश देशमुखांच्या आत्म्यास शांती लाभो आणि दुःखाच्या या प्रसंगी त्यांच्या कुटुंबीयांना धैर्य लाभो, ही प्रार्थना. तर मराठा आंदोलनाच्या लढ्यात केज तालुक्यातील मराठा योद्धा धारातीर्थ पडला, अशी भावना यावेळी खासदार बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केली.प्रत्येक आंदोलनात आणि मोर्चामध्ये ते हजेरी लावत असत. यावेळी देखील ते चलो मुंबई मोर्चात सहभागी झाले होते, मात्र जुन्नर येथे अचानक त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर त्यांना तातडीने रूग्णालयात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं.केज तालुक्यातील वरपगाव येथील सतीश ज्ञानोबा देशमुख हे त्यांच्या मित्रासोबत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत मुंबई येथे आंदोलनात सहभागी होण्यासाठी निघाले होते. ते पुणे जिल्ह्यातील नारायणगाव येथे आले असता त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यात त्यांचा मृत्यू झाला असल्यानं केज तालुक्यात एक मराठा योद्धा आरक्षणाच्या लढाईत कामी आला आहे. मागील तीन वर्षांपूर्वी त्यांच्या एका मुलाचा देखील विजेचा शॉक लागून मृत्यू झालेला होता. सतीश यांचे वडील सैन्यात कार्यरत होते. सतीश यांच्या पश्चात पत्नी संध्या, मुलगा प्रसाद आणि वृद्ध आई पुष्पा असा परिवार आहे. या घटनेनं जिल्ह्यासह आंदोलनातील मराठा बांधव यांच्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# उद्धव ठाकरेंची चिंता वाढवणारी बातमी, राज ठाकरेंच्या भेटीनंतर शिंदेंच्या वक्तव्याने सस्पेन्स वाढवला

**मुंबई :** राज्यभरात गणेशोत्सवाचा उत्साह बघायला मिळतोय. राज्यात घराघरात गणरायाचं आगमन झालं आहे. गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी घराघरात पाहुणे मंडळी, नातेवाईक, मित्रमंडळी एकमेकांच्या घरी जात आहेत. या निमित्ताने सर्वजण एकत्र येत आहेत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या घरी देखील काल गणपती बाप्पाचं आगमन झालं. यानंतर अनेक बड्या नेतेमंडळींनी राज ठाकरे यांच्या घरी दाखल होत त्यांच्या घरच्या बाप्पाचं दर्शन घेतलं. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे काल सकाळी कुटुंबासह राज ठाकरे यांच्या घरी दाखल झाले होते. उद्धव





ठाकरे तब्बल दोन दशकांनंतर राज ठाकरेंच्या घरी गेले. यामुळे आता दोन्ही ठाकरे बंधू आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं. पण यानंतर वेगळ्याच घडामोडी घडलेल्या बघायला मिळत आहेत.उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांच्या घरी भेट दिल्यानंतर लगेच त्याचदिवशी दुपारी वेगळ्या घडामोडी घडल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ निवासस्थानी दाखल झाले. देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरेंच्या घरच्या बाप्पाचं दर्शन घेतलं. यानंतर खासदार संजय राऊतांनीदेखील राज ठाकरेंच्या निवासस्थानी जात बाप्पाचं दर्शन घेतल्याची माहिती समोर आली होती. पण उद्धव ठाकरे यांची चिंता वाढवणारी बातमी आज समोर आली आहे.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज राज ठाकरे यांच्या घरी दाखल होत त्यांच्या घरच्या बाप्पाचं दर्शन घेतलं. राज ठाकरे यांच्या भेटीनंतर एकनाथ शिंदे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी जे वक्तव्य केलं त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नवा सस्पेन्स निर्माण झाला आहे. एकनाथ शिंदे यांच्या मनात नेमकं काय आहे? किंवा राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यात नेमकी काय चर्चा झाली असेल? याबाबत वेगवेगळे तर्कवितर्क लावले जात आहेत.

राज की बात राजही रहने दोङ्घ, असं म्हणत एकनाथ शिंदेंनी राज ठाकरेंच्या भेटीनंतर सस्पेन्स वाढवला आहे. ङ्घआमच्यात जी चर्चा झाली ती खाजगीच राहु द्या. काही लोकांना आत्ता स्नेहसंबंध आठवले, मात्र आमचा स्नेह आधीपासूनङ्घ, असा टोला एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला. ङ्घआमच्यात स्नेह असल्याने भोजनही लवकरच होईलङ्घ, असंदेखील सूचक वक्तव्य एकनाथ शिंदे यांनी केलं.

## पुण्यात ड्युटीवर असताना महिला चा विनयभंग, अधिकाऱ्यांकडून त्यांचीच बदली, कोर्टाकडून स्थगिती...

**पुणे :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महिला वरिष्ठ पोलिस निरीक्षकांवर करण्यात आलेला बदली आदेश प्रशासकीय न्यायाधिकरणाने रद्द केला आहे. हा बदलीचा आदेश दंडात्मक स्वरूपाचा आणि सूडबुद्धीने काढल्याचे दिसून येते, असे निरीक्षण न्यायाधिकरणाने स्पष्ट केले असून, या निर्णयामुळे संबंधित महिला अधिकाऱ्यास मोठा दिलासा मिळाला आहे.संबंधित महिला वरिष्ठ पोलिस निरीक्षकांची जुलै २०२४ मध्ये बदली होऊन पुणे शहरात नेमणूक झाली होती. जून २०२५ मध्ये त्या बंदोबस्त ड्युटीवर असताना शिवाजी रस्त्यावर त्यांचा विनयभंग झाला. त्यांनी तत्काळ वरिष्ठांना माहिती देऊन फरासखाना पोलिस ठाण्यात आरोपी प्रमोद कोंढरेविरुद्ध गुन्हा नोंदवला. या घटनेच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त आयुक्तांनी संबंधित अधिकारी महिलेला अन्य ठिकाणी बदली स्वीकारण्याचा सल्ला दिला. मात्र, त्यावर अधिकारी महिलेने ठामपणे नकार देत सांगितले, मी गुन्हा दाखल केला आहे; आता बदली झाली, तर समाजात चुकीचा संदेश जाईल, असे सांगून त्यानंतर त्या रजेवर गेल्या.रजेवरून परत आल्यानंतर २१ जुलैला त्यांना वाहतूक शाखेत बदली झाल्याचा आदेश मिळाला. हा आदेश पोलिस स्थापना मंडळाच्या निर्णयानुसार घेतल्याचे सांगण्यात आले. मात्र, प्रत्यक्षात आदेश मनमानी, दंडात्मक आणि महिलांच्या प्रतिष्ठेला धक्का देणारा असल्याचे त्यांनी न्यायाधिकरणात मांडले.महिला पोलिस निरीक्षकाच्या बदलीचा आदेश आधीच दिनांकित आहे. कारणे दाखवा नोटीस न देता आदेश प्रसिद्ध केला गेला. निरीक्षकाच्या विरोधात अहवाल शनिवारी तयार करून दोन दिवसांतच आदेश काढला गेला. त्यांच्या शिस्तीवर कधीही कारवाई झालेली नव्हती, उलट त्यांना प्रशस्तिपत्रके व पुरस्कार मिळाले आहेत, असे त्यांनी न्यायाधिकरणात मांडले.

# मराठा आणि ओबीसी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ९ सप्टेंबरपर्यंत जमावबंदी, धाराशिवमध्ये प्रशासनाचा मोठा निर्णय

**धाराशिव:** जिल्हा प्रशासनाच्या वतीने मोठा निर्णय घेण्यात आला आहे. मराठा आणि ओबीसी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर धाराशिवमध्ये ९ सप्टेंबरपर्यंत जमावबंदी लागू करण्यात आली आहे. उपोषण, मोर्चे, आंदोलन, रस्तारोको, याचबरोबर सभा घेण्यास देखील बंदी घालण्यात आली आहे. याचबरोबर, पाच पेक्षा जास्त लोकांना एकत्रित येता येणार नाही. असे स्पष्ट आदेश प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहेत. अप्पर जिल्हा दंडाधिकारी शोभा जाधव यांच्याकडून हे मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानी मुळेच शेतकरी आंदोलन करण्याची धास्ती जिल्हा प्रशासनाने घेतली आहे. गणेशोत्सवात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी प्रशासनाने जमाबंदीचा निर्णय घेतला आहे. धार्मिक कार्यक्रमांना सरकारचा आदेश लागू नसणार हे देखील स्पष्ट करण्यात आले आहे. मराठा आरक्षणासाठी सुरु असलेल्या राज्यव्यापी आंदोलनाला धाराशिव जिल्ह्यातील मराठा बांधवांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. जिल्ह्यातील अनेक गावांतून कार्यकर्ते थेट मुंबई गाठण्यासाठी अनेक मराठा समाज बांधव वाहने रवाना झाली आहेत. विशेष म्हणजे आंदोलनासाठी खास ट्रॅक्टर तयार करण्यात आले असून, या ट्रॅक्टरमध्ये पंधरा दिवसांचा स्वयंपाक, पिण्याचे पाणी, भांडीकुंडी, औषधांचा साठा यासह सर्व व्यवस्था करण्यात आली आहे. आंदोलनादरम्यान कोणतीही अडचण येऊ नये यासाठी काटेकोर नियोजन करण्यात आलं आहे. दरम्यान, गावोगावी मोठी जनजागृती सभा पार पडल्या. यावेळी गावकऱ्यांनी एकमुखाने ठरवले की ङ्घआरक्षण घेतल्याशिवाय मुंबईहून माघारी फिरायचं नाहीङ्घ असा निर्धार करून आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हायचं. मुंबईला जाण्यासाठी गावागावांतून तरुण, महिला, शेतकरी, कामगार सर्वजण या लढ्यात सहभागी होत आहेत. जिल्ह्यातून तब्बल हजारांवर मराठा बांधव आंदोलनात सक्रिय सहभाग घेणार आहेत. गावोगावांत ढोल-





ताशांच्या गजरात, घोषणाबाजी करत या वाहनांची सजावट करून आंदोलनात सहभागी होण्याची मुंबईच्या दिशेने गेले आहेत. आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र जिल्ह्यात दिसत आहे. दरम्यान, मुंबईला जाण्यासाठी कार्यकर्ते ट्रॅक्टर, जीप, मोटारसायकल, खासगी गाड्यांसह निघाले आहेत. ङ्घआरक्षण हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे. आता कुठल्याही परिस्थितीत मागे हटायचं नाहीङ्घ अशी भूमिका मराठा समाजाने घेतली आहे.

# आम्ही एकत्र राहावं हीच इच्छा घटस्फोटाच्या चर्चांदरम्यान गोविंदाचं वक्तव्य

## नेमकं कोणाबद्दल म्हणाला अभिनेता?


**मुंबई -** बॉलिवूड सुपरस्टार गोविंदा , सुनीता अहुजाला घटस्फोट देणार असल्याच्या चर्चा होत्या. मात्र, गणेश चतुर्थीला गोविंदा आणि सुनीता एकत्र उत्सव साजरा करताना दिसले आणि दोघांनीही या सर्व चर्चांना पूर्ण विराम दिला. या दरम्यान, गोविंदाने चाहत्यांना त्यांनी एकत्र राहण्यासाठी प्रार्थना करण्याचं सांगितलं आहे. त्याच वेळी घटस्फोटाबद्दल विचारलं असता सुनीतानेही उत्तर दिलं.गणेश चतुर्थीला माध्यमांशी बोलताना गोविंदा म्हणाला, ज्यांच्यावर गणपतीची कृपा असते, देवाची कृपा असते, त्याच्या कुटुंबातील संकटं दूर होतात, दुःखं आणि अडथळे दूर होतात आणि समाजासोबत एकत्र राहू शकतो. तुमच्या सगळ्यांच्या इच्छेप्रमाणे आम्ही पण एकत्र राहू अशी प्रार्थना करतो.यादरम्यान, गोविंदाने त्याच्या मुलांना यशवर्धन आणि टीना यांना सपोर्ट करण्याचं आवाहनही केलं. गोविंदा म्हणाला, मी विशेषतः तुम्ही सर्वांनी यश आणि टीनाला सपोर्ट करावं अशी इच्छा व्यक्त करतो. मी गणपती बाप्पाला प्रार्थना करतो की, ते त्यांच्या कामात यशस्वी व्हावेत. त्यांचं नाव माझ्यापेक्षा कितीतरी पटीने मोठं असावं. गोविंदाची मुले कोणत्याही आधाराशिवाय यशस्वी होत आहेत याचं लोकांना आश्चर्य वाटतं, जसं मी कोणत्याही आधाराशिवाय आलो होतो, आईची कृपा होती. त्याचबरोबर जेव्हा पापाराझींनी गोविंदा आणि सुनीता यांच्या घटस्फोटाबद्दल विचारलं तेव्हा सुनीता म्हणाली, तुम्ही लोक वाद ऐकण्यासाठी आला आहात की गणपती बाप्पाचं दर्शन घेण्यासाठी आला आहात? पापाराझींशी



बोलताना, सुनीताने तिच्या चाहत्यांनी तिच्या व्लॉग्सना दिलेल्या प्रेमाचं कौतुक केलं. ती म्हणाली- मला माहित आहे की माझे चाहते माझे व्लॉग्स खूप आवडीने बघत आहेत.

त्याचबरोबर एएनआयने सुनीताचा एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये तिने घटस्फोटाची बातमी पसरवणाऱ्यांना चोख उत्तर दिलंय. सुनीता म्हणाली, जर काही झाले असतं तर आपण आज एकत्र असतो का? आपण दूर असतो. वरून कोणीही येवो, देव येवो किंवा राक्षस, कोणीही आम्हाला वेगळं करू शकत नाही. तो एक चित्रपट होता, मेरा पति सिर्फ मेरा है तसं माझा गोविंदा फक्त माझा आहे आणि इतर कोणाचाही नाही. जोपर्यंत आम्ही काही बोलत नाही, तोपर्यंत कोणीही काहीही अफवा पसरवू नये.

# पतीनेच दिलेली पत्नीला संपवण्याची सुपारी; अमरावती महिला पोलिसाच्या हत्येचं गूढ उकललं,



**अमरावती:** वडाळी परिसरातील गुरुकृपा कॉलनी येथे राहणाऱ्या महिला पोलिस कर्मचारी आशा धुळे-तायडे (वय ३८) यांची हत्या त्यांचा पती राहुल तायडे यानेच केल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. पत्नीसोबत वाद व दुसऱ्या महिलेसोबत अनैतिक संबंध यामुळे ही हत्या झाल्याचे पोलिसांनी सांगितले. राहुल हा राज्य राखीव पोलिस दलात कार्यरत आहे. या प्रकरणी पोलिसांनी राहुल तायडे याला अटक केली आहे. त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने पाच दिवसाची पोलिस कोठडी सुनावली. आशा यांची हत्या करणाऱ्या दोन्ही मारेकऱ्यांचा पोलिस शोध घेत आहेत.आशा धुळे यांची शुक्रवारी सायंकाळी हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात पोलिसांना राहुल तायडे याच्यावर संशय होता. आशा यांच्या बहिणीने याबाबत तक्रार दिली होती. त्यामध्ये राहुल याच्यासोबत आशा याचा वाद असल्याचे नमूद केले होते. त्याच्याविरोधात आशा यांनी पोलिसांत तक्रारदेखील दिली होती. त्यामुळे पोलिसांनी राहुल तायडेला ताब्यात घेवून त्याची कसून चौकशी केली. त्यावेळी त्याने आशा यांची हत्या केल्याची कबूली दिली.राहुल याचे अन्य एका महिलेसोबत अनैतिक संबंध होते. यामुळे त्याचे आशासोबत वाद होत होते. त्याला दुसऱ्या महिलेसोबत विवाह करायचा होता, ही बाब तपासात उघड झाली असल्याचे पोलिस उपायुक्त गणेश शिंदे यांनी सांगितले. राहुल याने आशा यांची सुपारी देवून हत्या केली, ही बाब त्याच्या १४ वर्षीय मुलामुळे उघडकीस आल्याचे ते म्हणाले.आशा यांची नियोजनपूर्वक हत्या झाल्याचे लक्षात येवू नये, यासाठी दरोड्याचा बनाव करण्यात आला. त्यामुळेच राहुल हा घरातील सोने चोरीला गेल्याचे सांगत होता. आशा या फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात कार्यरत होत्या. त्यांचा पती राहुल राज्य राखीव पोलिस दलामध्ये कार्यरत आहे. गेल्या महिन्यात १३ तारखेपासून आशा या रजेवर होत्या. त्यांना चौदा वर्षांचा एक मुलगा आणि सात वर्षांची मुलगी आहे. शुक्रवारी सायंकाळी राहुल हा मुलीला शिकवणी वर्गाला सोडण्यासाठी गेला होता. तर मुलगा शाळेत गेला होता. आशा या घरात एकट्या असल्याची संधी साधून राहुल याच्या दोन सहकाऱ्यांनी त्यांची हत्या केली.

# महाराष्ट्रातलं धगधगतं वास्तव! गरोदर महिलेला वेदना

## रस्ताअभावी बांबूच्या झोळीने सात किमी प्रवास; रस्त्यातच प्रसुती

**नंदुरबार :** नंदुरबार जिल्ह्यातील दुर्गम भागात बारमाही रस्ते नसल्यानं तेथील नागरिकांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागत आहे. अक्कलकुवा तालुक्यातील अतिदुर्गम पिंपळखुटा ग्रामपंचायती अंतर्गत येणाऱ्या वेहगीच्या बारीपाडा येथील गरोदर मातेला काल मंगळवारी रोजी प्रसुती वेदना होत होत्या. वेहगी बारीपाडा येथे जाण्यास पक्का रस्ता नाही. गावाच्या मधोमध येणाऱ्या देव नदीवर पूल नाही. तसेच वेहगी परिसरात मोबाईल रेंज नसल्यामुळे १०२ रुग्णवाहिकेला संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे गरोदर मातेला प्रसुती वेदना झाल्यानं मातेला झोळी करुन बांबूच्या साहाय्याने वेहगीच्या पालाहपाटी पाडा येथील मुख्य



रस्त्यापर्यंत सुमारे सात किलोमीटर अंतरापर्यंत बांबूच्या झोळीनं आणण्यात आलं.मात्र, रस्त्यातच मातेची प्रसुती झाली. खासगी वाहनाच्या मदतीने पिंपळखुटा येथील ग्रामीण रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले. याबाबत ग्रामस्थांनी सांगितलं की, वेहगी गावात ते बारीपाडापर्यंत रस्ता व्हावा, यासाठी वारंवार संबंधित विभाग, लोकप्रतिनिधी यांना लेखी निवेदन सादर करण्यात आलं आहे. तसेच ३० सप्टेंबर २०२४ रोजी गावकऱ्यांतर्फे रास्ता रोको आंदोलन करण्यात आलं होतं. त्यावेळीदेखील आश्वासन देण्यात आलं होतं. मात्र, ते अद्यापपर्यंत हवेतच विरले असल्याने येथील ग्रामस्थांकडून संतप्त भावना व्यक्त केल्या जात आहेत. याबाबत दिलीप पाडवी, जलपत तडवी, गीताबाई पाडवी, ईश्वर वळवी, विजयसिंग वसावे यांनी रस्त्यासाठी पुढील कार्यवाही करणार असल्याचे सांगितली. अक्कलकुवा तालुक्यातील अतिदुर्गम भागातील अनेक गाव पाड्यांवर जाण्यासाठी अद्यापही बारमाही रस्ते नाहीत.

नद्यांवर पूल नसल्यामुळे आरोग्याचे प्रश्न, शिक्षण व ग्रामस्थांना गावपाडे गाठण्यासाठी मोठी कसरत करावी लागत असल्याचे दिसून येत आहे. संबंधित प्रशासनाने व लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष देऊन सर्व गावपाडे बारमाही रस्त्यांनी जोडण्यासाठी प्रयत्न करणे काळाची गरज आहे.नदीवर पूल नाही आणि नदीच्या पलीकडे जाण्यासाठी पर्यायी व्यवस्थाही नाही...

अशा स्थितीत नदीला पूर आलेला असल्याने मृतदेहाला दोरीच्या साह्याने दुसऱ्या बाजूला नेऊन अंत्यविधी करण्याची वेळ नागरिकांवर आली. नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यातील धवळीविहीर ग्रामपंचायत हद्दीमधील रोझवा प्लॉट येथील नागरिकांना हे दिव्य करावे लागले.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सरकारवर आमची नजर, गरज पडल्यास मुंबई गाठू...

## ओबीसी नेत्याची मोठी घोषणा; फडणवीसांची कोंडी

**नागपूर :** ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावर पुन्हा एकदा संघर्षाची भूमिका घेण्यात आली आहे. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी यांनी स्पष्ट केलं की, ओबीसी समाजाला मिळालेलं आरक्षण कुठल्याही परिस्थितीत धोक्यात येऊ देणार नाही. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण देणं, सरसकट कुणबी प्रमाणपत्र वाटप करणं, हे अन्यायकारक असल्याचं ते म्हणाले. तायवाडे यांनी सांगितलं की, आज ऑफलाईन आणि ऑनलाइन अशा दोन्ही बैठका घेऊन आगामी आंदोलनाची रूपरेषा ठरवण्यात आली. उद्यापासून जिल्हानिहाय



पत्रकार परिषदा घेऊन पदाधिकारी जनजागृती करतील. परवा नागपुरातील संविधान चौकात साखळी उपोषण सुरू करण्यात येईल. त्यानंतर विविध जिल्ह्यांमध्ये निदर्शने, धरणे यांचे आयोजन करून सरकारचं लक्ष वेधलं जाईल.सरकारने आजवर ओबीसी आरक्षणाबाबत ठाम भूमिका घेतली आहे. मुख्यमंत्री यांनी १० टक्के आरक्षणाबाबत भूमिका मांडल्याबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो. परंतु आंदोलकांच्या दबावतंत्रामुळे सरकार कुठे झुकते का, यावर आमची नजर आहे. सरकारने ठाम राहिलं पाहिजे, असे तायवाडे म्हणाले.ते पुढे म्हणाले, शेतकरी हा ओबीसी समाजाचा घटक आहे. त्याला योग्य ती नुकसान भरपाई मिळाली पाहिजे. ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या मागण्या देखील सरकारसमोर रेटल्या जातील. समाजाच्या हक्कांसाठी लढा देणं अपरिहार्य आहे. आंदोलनाची दिशा स्पष्ट करताना तायवाडे यांनी सांगितलं की, सुरुवात साखळी उपोषणाने केली जाईल आणि गरज पडल्यास मोठ्या संख्येने मुंबई गाठली जाईल. १५ तारखेपासून मुंबई गाठण्यासाठी वातावरण तयार केलं जाईल. राज्यभरातून ओबीसी बांधव मुंबईत एकत्र येऊन सरकारचे लक्ष वेधतील, अशी घोषणा त्यांनी यावेळी केलीय.सध्या विधानसभेत ९० पेक्षा अधिक ओबीसी आमदार आहेत. त्यांनी समाजाच्या पाठीशी उभे राहून ठाम भूमिका घ्यावी, असं आवाहन तायवाडे यांनी केलं. सरकारला आमच्या मागण्या लेखी स्वरूपात द्याव्या लागतील. अन्यथा ओबीसी समाज तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारेल, असा इशाराही यावेळी बबनराव तायवाडे यांनी दिला. दरम्यान, तायवाडे यांच्या घोषणेमुळे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कोंडी झाल्याचं पाहायला मिळत आहे.

## हिंदूंच्या मोठ्या सणाच्या काळात आंदोलन करण्यापेक्षा ४ दिवसांनी..; बावनकुळे जरांगेंच्या भूमिकेवर काय म्हणाले?



**नागपूर :** आंदोलना बाबतीत बोलतांना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी भूमिका मांडली आहे. ते म्हणाले, ङ्खहिंदूंच्या मोठ्या सणाच्या काळात आंदोलन करण्यापेक्षा चार दिवसांनी आंदोलन केलं असतं तर काही फरक पडला नसता. पण सणाच्या काळात समाजात तणाव निर्माण करणं योग्य नाही. सरकारने संवादासाठी दरवाजे खुले ठेवले आहेत. चर्चा झाली पाहिजे, मात्र समाजात तेढ निर्माण होणार नाही, असा मार्ग काढावा.फ्रबावनकुळे पुढे म्हणाले, ङ्ख बाळासाहेब थोरात, नाना पटोले, वडेट्टीवार यांसारख्या नेत्यांची भूमिका काय आहे? जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला समर्थन म्हणजे ओबीसींच्या विरोधात जाणं आहे का? काँग्रेस नेते गोल गोल भूमिका घेत आहेत. सरड्यासारखी भूमिका बदलून लोकांची दिशाभूल करणं योग्य नाही.फ्र असेही बावनकुळे म्हणाले. बावनकुळे यांनी काँग्रेसवर देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात व्यक्तिगत टीका केल्याचा आरोप केला. ङ्खफडणवीस यांच्यावर ते मराठा नाहीत म्हणून हल्लाबोल केला जातो. हा अन्यायकारक दृष्टिकोन आहे. फडणवीस हे अष्टपैलू नेते आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांचं कौतुक होतं, पण फडणवीस यांच्यावर जातीय टीका केली जाते. हे महाराष्ट्र स्वीकारणार नाही. राज्याच्या विकासासाठी त्यांनी जेवढं काम केलं आहे, त्याचं कौतुक व्हायला हवं.फ्रभाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल करताना मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर त्यांची भूमिका स्पष्ट करण्याची मागणी केली. ङ्खसरकारने नेहमीच मराठा समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. २०१४ साली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्यांदा मराठा समाजाला आरक्षण दिलं. त्याच पद्धतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील न्याय देतील. मात्र एका समाजाचं आरक्षण काढून दुसऱ्या समाजाला देणं हे ना सामाजिक दृष्ट्या योग्य आहे, ना संविधानिक,फ्र असे ते म्हणाले.काँग्रेसवर टीका करताना बावनकुळे यांनी सवाल केला की, ङ्खराहुल गांधी एका बाजूला ओबीसी समाजाच्या पाठीशी उभे राहण्याची घोषणा करतात, जातीय गणना करण्याची मागणी करतात, पण महाराष्ट्रात काँग्रेस नेते मात्र ओबीसींचं आरक्षण कमी करून मराठा समाजाला द्यावं अशी भाषा करतात. यात नेमकी भूमिका काय? काँग्रेसने आजच स्पष्ट करावं की त्यांना ओबीसींचं आरक्षण काढून टाकायचं आहे का, की मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण द्यायचं आहे?फ्रराष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या बैठकीचा उल्लेख करताना ते म्हणाले, ङ्खओबीसी समाजाचं आरक्षण कधीच कमी होणार नाही, ही आमची ठाम भूमिका आहे. मराठा समाजाला वेगळं आरक्षण द्यावं, त्यासाठी प्रयत्न व्हावेत. पण एका समाजाच्या हक्कांवर गदा आणून दुसऱ्याला देणं अन्यायकारक आहे. शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यासारखे नेते अनेक वर्षं सत्तेत होते, पण त्यांनी मराठा समाजाच्या प्रश्नावर ठोस निर्णय घेतला नाही. फडणवीसांनी मुख्यमंत्री होताच पुढाकार घेतला आणि आरक्षण दिलं.फ्र ङ्खओबीसींच्या १८ पगड जातींचं आरक्षण कमी करून काँग्रेस मराठा समाजाला देणार का? की ते वेगळं आरक्षण देण्याच्या भूमिकेत आहेत? ही भूमिका आजच स्पष्ट करावी. कारण गोंधळात टाकणाऱ्या भूमिका घेऊन समाजात तेढ निर्माण करणं योग्य नाही.फ्र असा सवालही बावनकुळे यांनी काँग्रेसला केला.

## शुभमन गिल ड्रॉप, कोणते तीन खेळाडू ठरणार गेमचेंजर, वीरेंद्र सेहवागने खरं तेच सांगितलं..

**दिल्ली :** आशिया कपसाठी शुभमन गिलची जेव्हा भारताच्या संघात निवड करण्यात आली होती, तेव्हा संघ निवडीवर जोरदार टीका झाली होती. शुभमन गिलला फक्त संघातच स्थान दिले नाही तर त्याला उप कर्णधारही बनवले. पण शुभमन गिलला आता वीरेंद्र सेहवागने चक्क ड्रॉप केले आहे. सेहवागने यावेळी गेमचेंजर म्हणून कोणत्या तीन खेळाडूंची नावं घेतली आहेत, हे आता समोर आले आहे.भारतीय संघात अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन असे दोन सलामीवीर आहेत. तिसऱ्या स्थानावर तिलक वर्मा खेळायला येतो, तर चौथ्या स्थानावर सूर्या. त्यामुळे शुभमन गिलला कुठे खेळवायचं हा पश्न यापूर्वीही होता. पण तरीही शुभमन गिलला संघात संधी असली तरी त्याला कोणत्या स्थानावर खेळवणार,

हे सर्वात मोठा प्रश्न आहे. सेहवागनेही यावेळी भारताच्या सलामीवीराचे कौतुक करत असताना शुभमन गिलला मात्र ड्रॉप केले आहेवीरेंद्र सेहवाग म्हणाला की, ङ्ख माझ्यासाठी सलामीवीर म्हणून अभिषेक शर्मा हा गेमचेंजर आहे. गेल्या बऱ्याच सामन्यांमध्ये त्याने दमदार फलंदाजी केली आहे. त्यामुळे आशिया कपमध्ये तो गेमचेंजर ठरू शकतो. आशिया कपमध्ये दुसरा गेमचेंजर मला वाटतो तो, वरुण चक्रवर्ती. कारण वरुण चक्रवर्तीने आपल्या गोलंदाजीच्या जोरावर फलंदाजांना नाचवले आहे. आशिया कप युएईमध्ये होत आहे आणि तिथे वरुणची गोलंदाजी चांगलीच होईल,

असे मला वाटत आहे. या गेमचेंजरच्या यादीत तिसरे आणि अखेरचे स्थान मसा वाटते जसप्रीत बुमराहला द्यायला हवे. बुमराह हा जगविख्यात गोलंदाज आहे. जेव्हा तो फॉर्मात असतो तेव्हा कोणताही फलंदाज त्यांच्यासमोर लोटांगण घालतो. त्यामुळे आशिया कपसाठी हे तीन फलंदाज मला गेमचेंजर वाटतात. ङ्ख सध्या शुभमन गिलची चलती आहे, असे म्हटले जात आहे. पण तरीही सेहवागने यावेळी शुभमन गिलचे नाव गेमचेंजर यादीमधून ड्रॉप केल्याच पाहायला मिळत आहे. शुभमन गिलच्या नावाची जोरदार चर्चा असताना वीरेंद्र सेहवागने मात्र त्याला ड्रॉप केले आहे. सेहवागने आशिया कपसाठी जे तीन गेमचेंजर सांगितले आहेत, त्यांची कामगिरी कशी होते, याकडे आता सर्वांचे लक्ष असेल.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रासायनिक गुलालांची विक्री, साठवणुक व वापरण्यास बंदी; जिल्हाधिकारी यांचे आदेश

**जनसंचलन/बुलडाणा**

आगामी श्री गणेशोत्सव कालावधीत गुलालांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. रासायनिक गुलालाचा वापर केल्याने पर्यावरण व मानवी आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बुलडाणा जिल्ह्यात रासायनिक गुलालाचे उत्पादन, विक्री, साठवणूक व वापर करण्यास बंदी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले आहे. गणेशोत्सवात मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या रासायनिक गुलालामुळे पर्यावरण व मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे. गुलालामध्ये लेड ऑक्साईड, कॉपर सल्फेट, क्रोमियम आयोडाईड, ॲल्युमिनियम ब्रोमाईट यांसारखी घातक रसायने वापरली जातात. यामुळे डोळ्यांना ॲलर्जी, किडनीचे आजार, अस्थायी अंधत्व, ब्रॉन्कीअल अस्थमा, कॅन्सर यांसारखे आजार होण्याचा धोका असून माती, पाणी व हवेत प्रदूषण वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर गणेशोत्सव शांततेत, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून तसेच पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा व्हावा यासाठी रासायनिक गुलालांची विक्री, साठवणुक व वापर करणाऱ्यांवर पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ नुसार आदेश जारी केले आहेत. आदेश याप्रमाणे : बुलडाणा जिल्ह्यात रासायनिक गुलालाचे उत्पादन, विक्री, साठवणूक व वापर करणे कायमस्वरूपी बंदी, जिल्ह्यातील सर्व घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांना रासायनिक गुलालाची विक्री व



साठवणूक करण्यास सक्त मनाई, पर्यावरणपूरक पर्याय म्हणून नैसर्गिक, हर्बल, जैविक गुलालाचा वापर करावा. बंदीचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापना, दुकाने वा व्यक्तींवर कारवाई करण्याचे अधिकार संबंधित पोलीस प्रशासन व स्थानिक स्वराज्य संस्था यांना प्रदान करण्यात आले असून ते स्वतंत्ररित्या कारवाई करतील. सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ च्या कलम १५ नुसार कारवाई केली जाणार, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# आर्थिक साक्षरतेसाठी मेहकर येथे आर्थिक समावेशन कार्यक्रम; रि-केवायसी, विमा व योजनांवर तज्ज्ञांव्दारे मार्गदर्शन

**जनसंचलन/बुलढाणा**

ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये आर्थिक साक्षरता वाढविण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने वेदिका लॉन, मेहकर येथे ग्रामपंचायत स्तर आर्थिक समावेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय), सेंट्रल बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ इंडिया तसेच विविध वित्तीय संस्थांचे वरिष्ठ अधिकारी, स्थानिक प्रशासन व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी तज्ज्ञांव्दारे रि-केवायसी, विमा व शासनाच्या विविध योजनावर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आरबीआय नागपूर उप महाव्यवस्थापक अंजना शामनाथ यांनी भूषविले. तर सेंट्रल बँक ऑफ इंडिया, पुणेचे अंचालिक प्रबंधक अजय कुमार सिंग प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी सेंट्रल बँक ऑफ इंडिया अकोला क्षेत्रीय प्रमुख पंकज कुमार, स्टेट बँक ऑफ इंडिया, बुलढाणा क्षेत्रीय प्रमुख नीरज कुमार, आयसीआयसीआय बँक अंचालिक प्रबंधक विवेक बल्की, उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक प्रमोद लांडे, नाबार्ड रोहित गडे, अग्रणी जिल्हा प्रबंधक कौशलेन्द्र कुमार सिंग आदी उपस्थित होते. अंजना शामनाथ यांनी रि-केवायसीचे




महत्व अधोरेखित करत प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (पी.एम.जे.जे.बी.वाय), प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (पी.एम.एस.बी.वाय) आणि अटल पेन्शन योजना (ए.पी.वाय) याबाबत सविस्तर माहिती दिली. डिजिटल बँकिंगमधील सायबर सुरक्षा व सुरक्षित व्यवहारांवरही त्यांनी मार्गदर्शन केले. अजय कुमार सिंग यांनी सांगितले की, सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही प्रधानमंत्री जनधन योजना (पी.एम.जे.डी.वाय) व अन्य योजनांच्या अंमलबजावणीत आघाडीवर असून, ग्रामीण भागात जागरूकता व नोंदणीसाठी प्रयत्नशील आहे. पंकज कुमार यांनी आर्थिक समावेशन ग्रामीण विकासाचे बळ असल्याचे नमूद केले, तर कौशलेन्द्र कुमार सिंग (एलडीएम बुलढाणा) यांनी बँकांच्या संयुक्त उपक्रमाचे कौतुक करत जिल्ह्यातील नागरिकांना थकीत रि-केवायसी पूर्ण करण्याचे आवाहन केले. या उपक्रमाअंतर्गत १९ ऑगस्ट रोजी ९ हजार ९८७ रि-केवायसी तर २० ऑगस्ट रोजी ८ हजार ५६९ रि-केवायसी पूर्ण झाल्याची मोठी उपलब्धी नमूद करण्यात आली. कार्यक्रमादरम्यान विविध शासकीय योजनांअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना धनादेशांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मेहकर व परिसरातील नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला. आर्थिक साक्षरता व समावेशनाच्या दिशेने ग्रामीण भागासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना; ई-केवायसी, आधार सीडिंग करा- कृषी विभागाचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**


केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ मिळणाऱ्या शेतकऱ्यांपैकी २ हजार ७७९ शेतकऱ्यांची ई केवायसी आणि ४ हजार २५३ शेतकऱ्यांचे आधार सीडिंग प्रलंबित आहे. शेतकऱ्यांनी प्रलंबित ई केवायसी, आधार सीडिंग व बँक खात्याला डिबीटी इनेबल करणे किंवा इंडिया पोस्ट पेमेंट बँक मध्ये खाते उघडून त्या खात्याला आधार संलग्न करून डिबीटी इनेबल करण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाचे तंत्र अधिकारी समृद्धी वांगसकर यांनी केले आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेसाठी केंद्र आणि शासनाकडून वार्षिक प्रत्येकी सहा हजार आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेमार्फत वार्षिक प्रत्येकी सहा हजार रुपये शेतकरी कुटुंबांना दिले जात आहेत. त्यासाठी ई-केवायसी आणि आधार सीडींग करणे अत्यावश्यक आहे, नसल्यास शेतकरी लाभापासून वंचित राहतील. त्यासाठी शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषि कार्यालय व तालुक्यातील कृषी सहाय्यक किंवा गाव नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा म्हणजे लाभापासून कोणीही वंचित राहणार नाही, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

# किमान आधारभूत किंमत खरेदी योजनाचा लाभ घेण्यासाठी ई-पिक पाहणी आवश्यक

**जनसंचलन/बुलढाणा**

हंगाम २०२५-२६ मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार राज्यात नाफेड व च्या वतीने पणन महासंघामार्फत कडधान्य व तेलबिया पिकांची खरेदी करण्यात येणार आहे. खरेदीसाठी शेतकऱ्यांना ई-पिक पाहणी नोंद असलेला ७/१२ उतारा आवश्यक राहणार आहे. कडधान्य व तेलबिया पिकांमध्ये मुंग, उडिद, सोयाबीन व तुर या पिकांचा समावेश असून संपूर्ण खरेदी प्रक्रिया पारदर्शक, कार्यक्षम व पूर्णपणे ऑनलाईन प्रणालीद्वारे राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पणन अधिकारी एम. जी. काकडे यांनी दिली. केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांनी शासनाने दिलेल्या कालावधीत आपल्या पिकांची ई-पिक पाहणी पूर्ण करावी. अन्यथा शेतकऱ्यांना खरेदी योजनेत सामील होता येणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

# जेसीबी व ट्रॅक्टर ची बॅटरी शेतातून चोरट्यांनी केली लंपास अज्ञान चोरट्यां विरुद्ध गुन्हा दाखल



**जनसंचलन/मलकापूर**

मलकापूर शहर मधील घिर्णी निवासी युवा व्यवसाय,बजरंगदल तालुका सह संयोजक अनंता तुकाराम बगाडे यांचे स्वतःच्या मालकीचे व ट्रक्टर दिनांक २६ ऑगस्ट रोजी रात्री दहा वाजता वावरातून अज्ञात चोरट्यांनी व ट्रॅक्टरची बॅटरी व साहित्य किट चोरीची घटना घडली. सविस्तर माहिती अशी की, घिर्णी येथील अनंता बगाडे , ट्रॅक्टर चालक मालक व्यवसाय करून कुटुंबाचे पालण पोषन करीत असतात दि. २६/०८/२०२५ रोजी रात्री १०.०० वा. दरम्यान त्यांच्या मोबाइल वर आलेला तो संदेश रात्री ०१.३० वा त्यांनी बघितला असता त्यांच्या वाहनाच्या कोणीतरी बॅटरी काढल्या असल्याचे समजले असता रात्री ०१.४० वा दरम्यान सदर ठिकाणी शेतात जावुन पाहील असता व ट्रक्टरला असलेल्या बॅट-या अनुक्रमे १३० व ९० च्या दिसुन आल्या नाही तसेच, स्टाफलीक पार्ट, जॉक पाटा या वस्तुअंदाजे ३०,०००/-रु च्या वस्तु अज्ञात चोरांनी चोरून नेल्या आहेत या घटनेची मलकापूर शहर पोलीस स्टेशन येथे येऊन अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# नगर पालिकेकडून सफाई मजदूरांचे आर्थिक शोषण!

## तर बुलढाणा ते मुंबई पायी मोर्चा!

जनसंचलन/बुलढाणा

नगरपालिका बुलढाणा अंतर्गत शहरासह जिल्ह्यातील इतर ठिकाणी नेमलेल्या कंत्राटी सफाई कामगारांना किमान वेतन कायद्याप्रमाणे व सीएसआर दराप्रमाणे देण्यात यावे तसेच मुस्लिम बांधवांच्या परिसरामध्ये नपाचे कामगार दिल्यामुळे कामगारावर झालेला खर्च कंत्राटदारांच्या रनिंग बिलामधून वसूल करण्यात यावा,अशी मागणी अखिल भारतीय मजदूर संघटनेने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.दरम्यान भाजपचे जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी सफाई मजुरांच्या मागण्यांना समर्थन दिले आहे. न.प. बुलढाणा अंतर्गत कुमोदिनी रिसोर्सेस वाशिम यांना साफ सफाईचा कंत्राट देण्यात आलेला आहे. परंतु ते मुस्लिमबांधवांच्या भागात साफसफाईला जात नाही. त्या ठिकाणी नगर परिषदेचे आरोग्य निरीक्षक सुनिल बेंडवाल व बावने हे नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांकडून सफाईचे काम करुन घेत आहे.




वास्तविक पाहता कुमोदिनी रिसोर्सेस ला संपूर्ण शहराचा साफसफाईचा कंत्राट देण्यात आलेला आहे. तर कंत्राटदार मुस्लिम भागात साफसफाईला का जात नाही? आणि जर मुस्लिम भागातील साफसफाई नगर परिषदेचे कर्मचारी करत असेल तर त्या भागामध्ये काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांचा पगार कंत्राटदाराचे रनिंग बिलातून कपात करणे आवश्यक आहे. परंतु असे होत नाही. सुनिल बेंडवाल व बावने हे कोणत्या अधिकाऱ्याच्या आदेशाने मुस्लिम भागात काम करीत आहे? या बाबीची चौकशी तात्काळ करावी व मुस्लिम भागामध्ये नगर परिषदेचे जितके कर्मचारी काम करीत आहे तितक्या कर्मचाऱ्यांचा पगार कंत्राटदाराचे रनींग बिलामधुन कपात करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कंत्राटदार हे कंत्राटदाराचे कर्मचाऱ्यांना किमान वेतन प्रमाणे वेतन देत नाही.त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी मागण्या मान्य न केल्या तर ८ सप्टेंबर रोजी बुलढाणा ते मुंबई पायी मोर्चा काढून मुख्यमंत्री फडणवीस यांना भेटून चर्चा करण्यात येणार असल्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

# अवैध वाळूचे दोन ट्रक पकडले!

## तब्बल ५०,८०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्तीची कारवाई!

जनसंचलन/ चिखली




जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या आदेशाने अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात येत आहे.दरम्यान चिखली हद्दीत पथक गस्त घालत असताना,अवैध ८ ब्रास वाळूचे विना परवाना दोन ट्रक जप्त केले आहे. ८०,००० रुपये किंमतीची वाळू व ट्रक असा ५०,८०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. चिखली पोलीस स्टेशन हद्दीत २८ ऑगस्ट रोजी मलगी फाट्या नजीक दोन ट्रक विना परवाना अवैध वाळू वाहतूक करीत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. दरम्यान सदर वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रकला नाकेबंदी करून झाडाझडती घेतली असता, दोन्ही ट्रकमध्ये ८०,००० रुपये किमतीची ८ ब्रास वाळू आढळून आली. ट्रक व वाळू असा एकुण ५०,८०,००० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपी विरोधात कलम ३०३ (२) बीएनएस सहकलम २१(१),२१(२) गौणखनिज अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई एएसआय राजकुमार राजपूत, ओमप्रकाश सावळे,एचसी गजानन दराडे, जगदेव टेकाळे, दिगंबर कपाटे, वनिता शिंगणे, दीपक वायाळ या पथकाने केली.

# येत्या रविवारी वैभव विशाल गझल संध्या कार्यक्रम....

## पत्रकार संघांतर्गत वृत्तेश्वर गणेश मंडळाचे आयोजन...

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाण्यात पहिल्यांदाच पत्रकारांनी वृत्तेश्वरफ गणेश मंडळाची स्थापना करून विविध उपक्रम आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. त्यानुसार, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांच्या संकल्पनेतून येत्या रविवारी पत्रकार भवन परिसरात सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास ङ्गवैभव विशालफ या नावाने गझल संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बुलढाणा जिल्ह्याचे सुपुत्र असलेले राज्य शासन पुरस्कार प्राप्त, चित्रपट गीतकार वैभव देशमुख आणि लोकप्रिय गझलकार विशाल मोहिते यांच्या गझल आणि कवितांची ही अवीट मैफिल असणार आहे. याप्रसंगी उपस्थित राहून, कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सण उत्सव सामाजिक एकात्मियतेचे प्रतीक आहे. उत्सव काळात मानवी मूल्यांचा प्रचार आणि प्रसार होत असून, जीवनाला स्तकर्माची दिशाही प्राप्त होते. याच भावनेतून पत्रकार संघातर्गत वृत्तेश्वर गणेश मंडळातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यापैकी एक असलेल्या भजन स्पर्धेची प्रथम फ ेरी पार पडली. अंतिम फेरीसाठी पात्र ठरलेल्या स्पर्धकांची स्पर्धा शनिवार, ३० ऑगस्ट रोजी होणार आहे. रविवार, ३१ ऑगस्टला सकाळी ११ वाजता जिल्हा पोलीस दल आणि पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चित्रकला आणि निंबध स्पर्धेचे बक्षीस वितरण शहरातील कारंजा चौकस्थित प्रभा




हॉल येथे पार पडेल. यानंतर, सायंकाळी ६ वाजता पत्रकार भवन परिसरात वैभव-विशाल गझल संध्या ही मैफिल रंगणार आहे. सदर कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांनी केले आहे.

# बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाचा आकर्षण देखावा.....



जनसंचलन/बुलडाणा

दरवर्षीप्रमाणे यंदाही बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाचा वतीने बुलडाणा अर्बन संस्थेच्या मुख्यालयात श्रींची स्थापना संस्थेचे नुतन अध्यक्ष डॉ सुकेश झंवर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाचे हे यंदाचे हे २४ वे वर्षे आहे. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी, बुलडाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा सौ कोमलताई सुकेश झंवर यांनी सर्व कर्मचाऱ्यांना श्रीं स्थापनेच्या शुभेच्छा दिल्या . यावेळी आरतीला अनंतभाऊ देशपांडे संस्थेचे सरव्यवस्थापक कैलास कासट , बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेश मंडळाचे कार्यकारिणी आणि मुख्यालयातील सर्व पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षी गणेश मंडळाचा सुंदर असा देखावा साजरा केला जातो, यावर्षी देखील उज्जैन येथील महाकाल मंदिराचा भव्य देखावा उभारण्यात आला आहे, तर सोबतच आकर्षण अशी गणेश मूर्ती आहे . देखाव्याची अतिशय सूक्ष्म आणि आकर्षण अशी मांडणी करण्यात आली आहे. बाजारपेठेत खरेदी करता येणारे नागरिक मोठ्या उत्सुकतेने या आकर्षक देखाव्याची पाहणी करीत असतात

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८